Publication: Prahaar
Date: 12/11/2019
Page: 4
Column: 1

प्रहार
मंगळवार, १२ नोव्हेंबर २०१९
वेचक

## अदानीची ग्राहकांना सवलत

**मुंबई :** विजेची बचत करण्यासाठी अदानी इलेक्ट्रिसीटीने खास योजना आखली असून उच्च क्षमतेच्या पंख्याच्या खरेदीवर ४४ टक्के, तर पाच तारांकित रेफ्रिजरेटरच्या खरेदीवर ४७ टक्के सवलत मिळणार आहे. या माध्यमातून ग्राहक पाच तारांकित रेफ्रिजरेटच्या वापरामुळे प्रतिवर्षी सात दशलक्ष, तर उच्च क्षमतेच्या पंख्यांच्या वापरामुळे ६.४५ दशलक्ष विजेची बचत करून शकतील. वीज वापराबाबत प्रत्येक घरात रेफ्रिजरेटर व पंख्यांचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. उच्च क्षमतेच्या पंख्याच्या खरेदीवर ४४ टक्के, तर पाच तारांकित रेफ्रिजरेटरच्या खरेदीवर ४७ टक्के सवलत दिल्यामुळे ग्राहकांना वाजवी दरात ही उपकरणे मिळतील व त्यांच्या विजेच्या बिलातही कपात होईल, अशी अपेक्षा एईएमएल प्रवक्त्याने व्यक्त केली. या योजनेअंतर्गत आम्ही ग्राहकांना ५० हजार सिलिंग फॅन व २० हजार रेफ्रिजरेटर उपलब्ध करून देणार आहोत. या योजनेचा लाभ घेण्यासाठी तसेच नोंदणी करण्यासाठी ग्राहक १९१२२ या टोल फ्री क्रमांकावर किंवा www.adanielectricity.com या संकेतस्थळावर अर्ज करू शकतात. सध्या वीज बचत करणाऱ्या उपकरणांची सर्वाधिक गरज असून, अदानी इलेक्ट्रिसिटी आपल्या ग्राहकांना अशा प्रकारच्या उपकरणांच्या खरेदीसाठी प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने सहाय्य करेल, असे प्रवक्त्याने सांगितले.